**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१३९/२०१९</u>**

शिवाजी तुकाराम पराडे विरुध्द

बबन शिवराम पराडे व इतर.

CNRNOMHSO10001002019

**<u>आदेश निशाणी क्रमांक २८२</u>**

**(<u>दिनांक–०६/१२/२०२३</u>)**

गट नं.४१/१ मध्ये असणारे प्रतिवादीचे राहते घर ज्याची नोंद ३४३ यामध्ये कोणताही फेरबदल वादीने स्वतः अगर इतरांमार्फत या दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत करु नये म्हणून तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी यासाठी अर्ज केला आहे.

०२. थोडक्यात अर्ज आहे की, वादीने सदरचा दावा अतिक्रमण क्षेत्राचे कब्जेसाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. मौ.संगम, ता.माळशिरस येथील गट नं.४२/४ या मिळकतीमध्ये प्रतिवादीने सन २००१ मध्ये नातेसंबंधावरुन परवानगीने घर बांधले असून, त्यांची ग्रामपंचायतला घर क्र.३४३ म्हणून नोंद केलेली आहे. वादीने दिलेली परवानगी रद्द केल्याने सदर जागेचा कब्जा मागितला आहे, त्याला प्रतिवादीने कैफियत दिलेली आहे. वादी व प्रतिवादीचा पुरावा झालेला

आहे. वादीने प्रतिवादीच्या घराच्या नोंदी रद्द कराव्यात असा अर्ज पुर्वी गटविकास अधिकारी, माळशिरस यांना दिलेला होता, अशी विधाने करुन वादीने गट विकास अधिकारी यांचा पुरावा घेतला आहे. गटविकास अधिकारी यांनी प्रत्यक्षात असा कोणताही अर्ज त्यांच्या पाहण्यामध्ये आलेला नाही, याची चौकशी केली नाही, तसेच त्यांच्याकडे ग्रामपंचायत अधिनियम कलम १२४ प्रमाणे अपिलाची तरतुद नसून नि.क्र.१८५ बाबत कोणतीही माहिती नाही म्हणून साक्ष दिली. परंतु, वादी यांनी गटविकास अधिकारी यांच्याबरोबर हातमिळवणी करुन कोणताही अर्ज अगर तक्रार नसताना किंवा त्यांचे समन्स न काढता केवळ गावच्या कोतवालामार्फत प्रतिवादीला बोलावून घेवून वादीने तक्रार केलेली आहे, प्रतिवादीचे घराची नोंद रद्द करावी, अतिक्रमण केलेले आहे, अशी दमदाटी केल्याने प्रतिवादीने दि.०६/११/२०२३ रोजी गटविकास अधिकारी यांना वकीलामार्फत नोटीस पाठविली. ती नोटीस का पाठविली म्हणून प्रतिवादीची नोंद रद्द करण्याची कारवाई सुरु केली आहे. म्हणून अर्ज मंजूर करावा.

०३. या अर्जाला वादीने नि.क्र.२८४ वर म्हणणे दाखल केले आहे की, गटविकास अधिकारी यांच्याकडे मुंबई ग्रामपंचायत कर व फी अधिनियम १९६० अन्वये अपील दाखल करुन दि.०६/०७/२००० रोजी पोहोच घेतली आहे, त्यास

नि.क्र.१८५ पडले आहे. अपील दाखल केल्याच्या तारखेपासून गटविकास अधिकारी यांनी कसली कारवाई केली नसल्याने दि.११/३/२०२० रोजी वादीने, वकीलामार्फत नोटीस दिली. गटविकास अधिकारी यांनी साक्ष दिली आहे. अपीलाचे काम चौकशी झाली आहे. दोन्ही पक्षकार वादी, प्रतिवादी यांना बोलावून कागदपत्रे दाखल करण्यास सांगितले आहे. त्यामुळे चौकशीचे काम थांबविणे अयोग्य होणार आहे. दाव्यामध्ये गटविकास अधिकारी पक्षकार नाही. प्रतिवादीचा उलट दावा नाही. त्यामुळे प्रतिवादीला अर्ज देता येणार नाही. म्हणून अर्ज नामंजूर करावा.

०४. माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादीच्या हक्कात सकृतदर्श प्रकरण आहे काय? | होय |
| २. | न्यायाचे समतोल प्रतिवादीच्या हक्कात आहे? | होय |
| ३. | अर्ज नामंजूर केला तर प्रतिवादीचे नुकसान होईल? | होय |
| ४. | आदेश ? | अर्ज मंजूर केला. |

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबतः–**

०५. मी, वादी व प्रतिवादीच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा सन २००७ पासून प्रलंबित आहे. यामध्ये वादीने दावा मिळकतीचा कब्जा मिळावा यासाठी दाखल केला आहे. दावा मिळकत ग्रामपंचायत घर क्र.३४३ आहे. या अर्जातील मजकूराप्रमाणे व दाव्याचे अवलोकन केले असता, घर क्र.३४३ वर प्रतिवादीचा कब्जा आहे असे दिसून येते. याबद्दल वादीचा पुरावा बंद झाला आहे. प्रतिवादीच्या साक्षीदारांचा पुरावा चालू आहे. मालमत्ता कर नि.क्र.१७४ नुसार मालमत्ता क्र.३४३ मध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नावाचा उल्लेख आहे.

०६. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, गटविकास अधिकारी हे वादीच्या सांगण्यावरुन प्रतिवादीच्या नावची नोंद काही लेखी कारवाईशिवाय रद्द करणार आहेत. याउलट, वादीच्या विधीधांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादीचा उलट दावा नाही. त्यामुळे प्रतिवादीला निरंतर तात्पुरत्या मनाईचा अर्ज देता येणार नाही. गटविकास अधिकारी यांना चौकशी करण्यापासून थांबविता येणार नाही.

०७. मी वादीचे म्हणणे नि.क्र.२८४ चे अवलोकन केले, त्यामध्ये वादीने नमुद केले आहे की, गटविकास अधिकारी यांनी वादी व प्रतिवादी यांना बोलावून

कागदपत्र दाखल करण्यास सांगितले आहे. त्यामुळे चौकशीचे काम थांबविणे अयोग्य होणार आहे. यावरुन गटविकास अधिकारी यांनी मालमत्ता क्र.३४३ बद्दल चौकशी चालू केली, असे दिसून येते.

०८. वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, जर गटविकास अधिकारी यांनी बेकायदेशीररित्या चौकशी केली असेल तर प्रतिवादींनी त्याच्याविरुध्द अपील दाखल करावे. याला प्रतिवादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, गटविकास अधिकारी यांनी प्रतिवादीला नोटीस न देता चौकशी चालू केली आहे, त्यामुळे कशाच्या आधारे अपील दाखल करायचे.

०९. वर नमुद केल्याप्रमाणे, नि.क्र.२८४ नुसार गटविकास अधिकारी यांनी चौकशी चालू केली असे दिसून येते, पण त्या चौकशीची नोटीस किंवा त्या चौकशीचे प्रकरण याबद्दल दोन्ही पक्षांनी काही उल्लेख केला नाही. म्हणून कशाचे अधारे प्रतिवादी गटविकास अधिका–याच्या चौकशीविरुध्द अपील दाखल करतील हा प्रश्न आहे. वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, दाव्यामध्ये गटविकास अधिकारी पक्षकार नाहीत, जरी गटविकास अधिकारी पक्षकार नसले तरी, प्रतिवादीने, वादी यांनी स्वतः अथवा इतरामार्फत दावा मिळकतीच्या नोंदीमध्ये फेरबदल करु नये अशी मागणी केली आहे, त्यामुळे गटविकास अधिकारी या दाव्यात पक्षकार राहणे गरजेचे

नाही.

१०. जर गटविकास अधिकारी यांनी दावा मिळकतीची नोंद दावा चालू असताना बदलली तर त्यापासून दाव्यात गुंतागुंत वाढेल. दावा मिळकतीच्या स्वरुपास धोका निर्माण होवू शकतो. जेव्हा मिळकतीला धोका निर्माण होतो, अशा परिस्थीतीत वादी किंवा प्रतिवादी या दोघापैकी कोणीही तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज उलट दाव्याशिवाय आदेश ३९, नियम १अ प्रमाणे देऊ शकतो.

११. जर, गटविकास अधिकारी यांनी नोंद रद्द केली तर, वर नमुद केल्याप्रमाणे, दाव्यात गुंतागुंत वाढेल व मालमत्ता धोक्यात येवू शकते. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर 'होकारार्थी' देतो व मुद्दा क्र.४ च्या उत्तर खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

०१. मौ.संगम ता.माळशिरस येथील नोंद क्र.३४३ मध्ये वादी यांनी स्वतः अगर इतरामार्फत या दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत फेरबदल करु नये.

०२. अर्जाचा खर्च दाव्यात.

स्वाक्षरी/–

दिनांक – ०६/१२/२०२३.

(यु.व्ही.जोशी)

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माळशिरस.